QP: 00003486

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : १००**

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्रश्न १. अ.** ललित गद्य म्हणजे काय ते सांगून 'प्रवासवर्णन' आणि 'व्यक्तिचित्रण' या तिच्या प्रमुख प्रकारांच्या स्वरूपाविषयी विस्ताराने लिहा. २०

**किंवा**

**ब.** वसंत पवार आणि शांता शेळके यांच्यातील ऋणानुबंध 'वडीलधारी माणसे' या लेखसंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा.

**प्रश्न २. अ.** 'वडीलधारी माणसे' या लेखसंग्रहाच्या आधारे केशवराव कोठावळे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे चित्रण करा. २०

**किंवा**

**ब.** आशा भोसले यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा परिचय 'वडीलधारी माणसे' या लेखसंग्रहाच्या अनुषंगाने करून द्या

**प्रश्न ३.** टिपा लिहा. **(कोणत्याही दोन)** १०

अ. ललित गद्याच्या मर्यादा
ब. शांता शेळके आणि हृदयनाथ मंगेशकर यांची भेट
क. दुर्गाबाई भागवत यांचा वाचन व्यासंग
ड. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक – रा. श्री. जोग

**प्रश्न ४. मराठी लेखन नियमासंबंधी पुढील प्रत्येक गटातील एक प्रश्न सोडवा.**

**अ.** मराठीतील उद्गारवाचक चिन्ह, प्रश्नार्थक चिन्ह, कंस, अवतरण चिन्ह यांचा वापर कधी होतो ते सांगून त्याचे प्रत्येकी एक उदाहरण सांगा. ०५

**किंवा**

मराठीतील कोणतीही पाच विरामचिन्हे व त्यांची प्रत्येकी एक उदाहरण द्या.

**ब. पुढील परिच्छेदामध्ये विरामचिन्हांचा वापर करून पुन्हा लिहा.** ०५

आजचे एक नामवंत कादंबरीकार बाबा कदम कोल्हापूरचे. त्यांचे वडील आक्कासाहेब महाराजांचे पर्सनल सेक्रेटरी कदमांचे आजोळ अक्कलकोटचे त्यामुळे संस्थानी कहाण्या आणि रीतरिवाज त्यांना भरपूर अवगत. त्या आधाराने त्यांनी आपली राजधानी कादंबरी लिहिली त्यांनी पत्रात म्हटले बखर... वाचून मी अक्षरशः मंत्रमुग्ध झालो आहे... वाटले की मी केलेले लेखन नसून कालव्ययच रघुवीरसिंहाचे कॅरॅक्टर इतके

X0279Y282A39X0279Y282A39X0279Y282A39X0279Y282A39

जिवंत वाटले की कोण्या संस्थानचा हा अधिपती असावा याचा तर्क करीत राहालो या स्निग्ध मोकळ्या उद्गारात दिलदार सशक्त मराठा मनाचे रूप मला जाणवले मी ते मानले

**प्रश्न ५. वृत्तलेखन करा. (कोणतेही एक)** **१०**

**अ.** प्रसिद्ध मराठी कादंबरीकाराच्या नव्या कादंबरीच्या प्रकाशन कार्यक्रमाची माहिती देणारे वृत्तलेखन करा.

**किंवा**

**ब.** बोरिवली मध्ये रहदारीचा रस्ता खचून झालेल्या अपघाताची माहिती सांगणारे वृत्तलेखन करा.

**प्रश्न ६. वृत्तान्तलेखन करा. (कोणतेही एक)** **१०**

**अ.** ठाणे महानगरपालिकेद्वारे नव्याने सुरू झालेल्या मोफत वाचनालयाची माहिती देणारे वृत्तान्तलेखन करा.

**किंवा**

**ब.** मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या वतीने आयोजित केलेल्या नवोदित कवीच्या मुलाखतीवर आधारलेले वृत्तान्तलेखन करा

**प्रश्न ७. अर्जलेखन करा. (कोणतेही एक)** **१०**

**अ.** प्रियदर्शनी विद्यालय, गोरेगाव येथे मराठी विषयाच्या माध्यमिक शिक्षक पदासाठी मुख्याध्यापकाच्या नावे अर्जलेखन करा.

**किंवा**

ब. 'शब्द' या ग्रंथ प्रकाशन संस्थेमध्ये 'ग्रंथ वितरक साहाय्यक' या पदासाठी प्रकाशन प्रमुखांच्या नावे अर्ज लिहा.

**प्रश्न ८.** **१०**

अ. भाषांतराचे प्रकार सांगून भाषांतरकाराला कोणते भाषाज्ञान असले पाहिजे ते सांगा.

**किंवा**

**ब. भाषांतर करा.**

Your security is not your job, or your bank account, or your investments, or your spouse or parents. Your security is your ability to connect with the cosmic power that creates all things. I like to think that the power within me that breathes in my body is the same power that provides all that I need, and just as easily and simply. The Universe is lavish and abundant, and it is our birthright to be supplied with everything we need, unless we choose to believe it to the contrary.

X0279Y282A39X0279Y282A39X0279Y282A39X0279Y282A39